मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ कॉमर्स, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४

संदर्भ क्र.: एमएमसीसी/ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती/ २०२०-२०२१/ 969 — २८ डिसेंबर, २०२०

## नोटीस

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२०२१ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बाबत

वरिष्ठ महाविद्यालयातील (BBA,BBA (IB), BCA विद्यार्थ्यांन व्यतिरिक्त) सर्व खुल्या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२०२१ करीता चालू झालेली असून, सदर अर्ज **FRESH तसेच RENEWAL** चे अर्ज http://www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सदर शिष्यवृत्ती हि कुटूंबातील पहिल्या दोन अपत्या पुरतीच मर्यादित असून, त्या पुढील अपत्य या शिष्यवृत्तीस पात्र राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच आर्थिक वर्ष २०१९-२०२० करीता पालकांचे उत्पन्न हे ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी असून, त्याचा तहसीलदार कडून प्राप्त झालेला दाखल असणे आवश्यक आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे. नवीन तयार केला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी.

**चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना वरिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच अर्ज वरील शिष्यवृत्तीस लागू करावा.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | ऑनलाईन भरलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत |
| २. | १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ३. | मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ४. | १० वी /१२ वी/ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ५. | डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ६. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०१९-२०२० चा तहसीलदारचा दाखला ( उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- किंवा त्यापेक्षा कमी)(Original) |
| ७. | आधार कार्ड (झेरॉक्स) |
| ८. | राशन कार्ड (झेरॉक्स) |
| ९. | बँक पासबुक (झेरॉक्स) |
| १०. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ११. | चालू वर्षाकरीता पालकांचे अपत्यांबाबतचे स्वयं घोषित प्रमाणपत्र |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

योजेनेच्या सविस्तर माहितीसाठी तसेच संबधीत अभ्यासक्रम योजनेत समाविष्ठ आहे की नाही ते तपासण्यासाठी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि ०७.१०.२०१७ तसेच शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/ प्र.क्र.३५/तांशि-४, दि ३१.०३.२०१८ पहावे.

अर्ज भरताना कुठलीही अडचण येत असल्यास महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागास संपर्क साधावा.

वरील अर्ज अचूक भरून वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) व भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात जमा करावा अथवा अर्जाची प्रत इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत एकत्रित एकाच PDF मध्ये scholarship@mmcc.edu.in या ईमेल वर पाठवावी.

जो पर्यंत महाविद्यालयास स्कॉलरशिप अर्ज व इतर कागदपत्रे हि ईमेल द्वारे अथवा व्यक्तिशः जमा केले जात नाही तो पर्यंत महाविद्यालयाकडून Online Portal वर अर्जांची छाननी केली जाणार नाही. तसेच अद्याप MAHADBT पोर्टल वर अर्ज भरण्याची अंतिम तारीख महाविद्यालयास प्राप्त झालेली नसून, ती प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल व त्यानुसार मुदतीत भरलेल्या प्राप्त अर्जावरच महाविद्यालय स्तरावरून कार्यवाही केली जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी

**सोबत: RENEWAL करण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.**

Scanned with CamScanner